# खाद्य यात्रा
## तिळाचे लाडू

**साहित्य -**



१) १ वाटी भाजलेल्या तिळाचे कूट

२) १/२ वाटी भाजलेल्या दाण्याचे कूट

३) १/२ वाटी बारीक किसलेला गूळ

४) १ टेबलस्पून साजूक तूप

५) वेलची पावडर स्वादानुसार

**कृती -**

दाणे व तीळ मंद गॅसवर खमंग भाजून घ्यावे. गार झाल्यावर त्याचे कूट करावे. पॅनमध्ये गूळ घेऊन त्यात १ टेबलस्पून पाणी घालून गूळ विरघळला की लगेच गॅस बंद करावा. त्यात साजूक तूप, दाण्याचे व तीळाचे कूट, वेलची पावडर घालून नीट मिक्स करावे. त्याचे लहान आकाराचे लाडू वळावेत.

तिळगूळ घ्या गोड बोला !!

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**
**asdssd@gmail.com**